दैनिक जनप्रवास
बुधवार, दि. २७ मे २०२६

# विवेकानंद कॉलेज म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महाद्वार

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे



**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देऊन शैक्षणिक वाटचालीमध्ये सामर्थ्य निर्माण करण्याचे ज्ञान केंद्र म्हणजे विवेकानंद कॉलेज आहे. समाजातील निरनिराळ्या स्तरातून आणि परिस्थितीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये परिपूर्ण पोषक स्पर्धेचे वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करणे हेच अंतिम ध्येय या ज्ञान केंद्राचे आहे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी १२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी मांडले.

याप्रसंगी विज्ञान शाखेतील अनुक्रमे पहिले तीन प्रथमेश परमेश्वर काकडे याने ९४.६७ टक्के, श्रद्धा गणपती सुतार ९२.१७ टक्के संचिता नरेंद्र कुलकर्णी यांनी ९२ टक्के, वाणिज्य इंग्रजी माध्यम शाखेतील आर्या वरद दीक्षित आणि अनिश आनंदा संकपाळ यांनी ९५.६७ टक्के, मनुश्री प्रसन्ना शहा ९५.३३टक्के, स्वालीहा चौधरी ९३.३३ टक्के गुण मिळवून प्रथम तीन क्रमांक पटकावले.

वाणिज्य मराठी माध्यम शाखेतून साना देसाई ८८.६७ टक्के ,साक्षी बाबासो तोरस्कर, रणवीर राजाराम अनपट यांनी ८६ टक्के, स्नेहल माने ८४. ६७ टक्के गुण मिळवत प्रथम तीन क्रमांक पटकाविले. कला शाखेमधून आभा भूषण कपाले ८७.६७ टक्के, यशोधन नंदकिशोर अनुसे ८७.३३ टक्के ,संस्कृती राजेंद्र रानगे ८४. ८३ टक्के गुण मिळवून प्रथम तीन क्रमांक प्राप्त केले तसेच जिऑलॉजी विषयात ९ विद्यार्थ्यांनी, गणित विषयात ४ व अकौटन्सी विषयात ३ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले. अशा सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी मांडले. महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा ९९.२७ टक्के वाणिज्य ९२.७४ टक्के शाखेचा कला शाखेचा ८७.६७ टक्के इतका निकाल लागला आहे. सत्कारप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ शिल्पा भोसले, कला वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तर आभार विज्ञान शाखाप्रमुख प्रा. मुकुंद नवले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. वेदांते एस. पी. आणि प्रा. ए. पी.पाटील यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, पालक, विद्यार्थी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत

बुधवार दि. २७ मे २०२६



कोल्हापूर : नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला कुलगुरू डॉ. कामत यांची भेट

त. भा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस मंगळवारी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते त्यांचा संस्थेचे मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या भेटीमध्ये त्यांनी प्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. याप्रसंगी कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १४ कुलगुरुंपैकी ५ कुलगुरु हे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरु पदापर्यंतचा आपला प्रवास झाला आहे. या संस्थेचा विद्यार्थी आहे, याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य एस. एम. गवळी, आजीव सेवक डॉ. आर. व्ही. शेजवळ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, प्रा. महेश साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील आदी उपस्थित होते.